मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी जाहिर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी सन २००४ - २००५ या आर्थिक वर्षात करण्याबाबत.

BNM/2014

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- ग्रापापु-१००४/प्रक्र-६२/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- २१ एप्रिल, २००४**

**वाचा :-**

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००३/प्रक्र-२१०/पापु-०७, दिनांक १४ ऑक्टोंबर, २००३
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. एआरपी-१००३/प्रक्र-१८३/पापु-०८, दिनांक २०.११.२००३
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००३/प्रक्र-२१०/पापु-०७, दिनांक २७.२.२००४
४) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-२१०/पापु-०७, दिनांक १६.३.२००४

**प्रस्तावना :-**

मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी दिनांक १५ ऑगस्ट, २००२ रोजी राष्ट्रास उद्देशून केलेल्या भाषणात ग्रामीण भागातील पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी, पाणी टंचाई असलेल्या भागात १ लाख हातपंपाची उभारणी करणे, १ लाख ग्रामीण प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करणे व पिण्याच्या पाण्याच्या १ लाख परंपारिक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे या तीन देशव्यापी कार्यक्रमांची घोषणा केली होती. सदर कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यात करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भीय शासन निर्णयान्वये/शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. या कार्यक्रमांसाठी, संदर्भिय क्र.१ येथील दिनांक १४.१०.२००३ च्या शासन निर्णयान्वये सन २००३-२००४ व सन २००४-२००५ या दोन वर्षासाठीचे उद्दिष्ट संबंधित जिल्हा परिषदांना ठरवून देण्यात आले असून त्यापैकी सन २००३-२००४ चा कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक निधी संदर्भीय क्र. २ येथील दिनांक २०.११.२००३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांना मुक्त करण्यात आलेला आहे.

३. तथापि, संदर्भिय क्र.१ येथील दिनांक १४.१०.२००४ च्या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेले दोन वर्षाचे उद्दिष्ट एकाच वर्षात म्हणजे सन २००३-२००४ मध्ये पूर्ण करण्याच्या सूचना संदर्भिय क्र.४ येथील दिनांक १६.३.२००४ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. परंतु, अंमलबजावणीचा कालावधी कमी असल्यामूळे संदर्भिय क्र.१ येथील दिनांक १४.१०.२००३ च्या शासन निर्णयान्वये अन्वये सन २००३-२००४ करिता ठरवून दिलेले मूळ उद्दिष्ट ब-याच जिल्हा परिषदांनी अद्याप पूर्ण न केल्याचे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या दि.३१ मार्च,२००४ च्या अहवालावरुन निदर्शनास आले आहे. त्यामुळे, हे उद्दिष्ट सन

रोटा प्रिंट/एच-23(1000-4-04)1

२००४-२००५ च्या वर्षात पूर्ण करण्यास परवानगी देण्याची व सन २००४-२००५ करिता या कार्यक्रमांचे उद्दिष्ट ठरवून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन मा.पंतप्रधानांनी स्वातंत्रदिनी घोषित केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भीय क्र.१ येथील दिनांक १४.१०.२००३ च्या शासन निर्णयान्वये सन २००३-२००४ करिता जिल्हा परिषदांना ठरवून दिलेले उद्दिष्ट (ज्यासाठी संदर्भिय क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.) सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात **जून २००४ पर्यंत** पूर्ण करण्यास शासन मान्यता देत आहे. परंतु, कोणत्याही परिस्थितीत जून २००४ अखेर पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यावे.

२. मा.पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांसाठी सन २००४-२००५ वर्षात किती उद्दिष्ट पूर्ण करण्याची जिल्हा परिषदांची तयारी आहे याची माहिती सर्व जिल्हा परिषदाकडून मागविण्यात आली आहे. परंतु, चार ते पाच जिल्हा परिषदा वगळता इतर जिल्हा परिषदांकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे आता, या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात संबंधित जिल्हा परिषदेसमोर दर्शविल्यानुसार या कार्यक्रमासाठीचे सन २००४-२००५ करिताचे उद्दिष्ट ठरवून देण्यात येत आहे. हे उद्दिष्ट सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावे.

३. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठीचा निधी केंद्र शासनाकडून अद्याप प्राप्त झालेला नाही. तथापि, राज्यातील टंचाईची परिस्थिती पहाता, "पिण्याच्या पाण्याचा पारंपारिक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे" व "प्राथमिक शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे " या दोन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदांना देण्यात आलेल्या निधी पैकी शिल्लक राहिलेला निधी, तात्पुरती व्यवस्था म्हणून सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील "हातपंप उभारणीचा कार्यक्रम" राबविण्यासाठी खर्च करण्यास शासन परवानगी देत आहे.

४. सन २००४ - २००५ करिता या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध होताच वरिल तात्पुरत्या व्यवस्थेनुसार जेवढा निधी "हातपंप उभारणी" कार्यक्रमासाठी वापरला असेल तेवढा निधी, सन २००४-२००५ मध्ये हातपंप उभारणी कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधी मधून काढून संबंधित कार्यक्रमाकडे (ज्या कार्यक्रमामधून काढला असेल त्या कार्यक्रमाकडे) त्वरित वळता करावा.

५. **मा.पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पाणी पुरवठा विषयक तीन कार्यक्रमांसाठी जिल्हा परिषदांना या शासन निर्णयानुसार नेमून दिलेल्या उद्दिष्टांपैक्षा अधिक जास्त उद्दिष्ट हवे असल्यास तसे संबंधित जिल्हा परिषदांनी या विभागास त्वरित कळवावे.**

६. या कार्यक्रमांची अंमलबजावणी संदर्भिय शासन निर्णयातील/शासन परिपत्राकातील मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात यावी.या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा मासिक अहवाल यंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेमार्फत दरमहा पाठविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सुधाकर ज्ञा.बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
१. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
२. विभागीय आयुक्त (सर्व)
३. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
४. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
९. तहसीलदार (सर्व)
१०. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
११. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१८. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१९. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२०. मंत्रालयातील सर्व विभाग
२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
२२. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विवरणपत्र | | | |
| (शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००४/प्रक्र-६२/पापु-०७, दि.२१ एप्रिल, २००४ चे सहपत्र) | | | | |
| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | हातपंप उभारणी | पिण्याच्या पाण्याच्या पारंपारिक स्त्रोताचे पुनरुज्जीवन | प्राथमिक शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे |
| | | सन २००४-२००५ | सन २००४-२००५ | सन २००४-२००५ |
| १ | २ | ४ | ७ | १० |
| १ | ठाणे | ५३ | ५३ | २५ |
| २ | रायगड | ५३ | ५३ | ७० |
| ३ | रत्नागिरी | ५३ | ५३ | ७० |
| ४ | सिंधुदुर्ग | ५७ | ५७ | ७० |
| ५ | नाशिक | ३३२ | २०० | ५० |
| ६ | धुळे | ५३ | ५३ | ७० |
| ७ | नंदूरबार | ५३ | २० | ७० |
| ८ | जळगाव | ५३ | ५३ | ७० |
| ९ | अहमदनगर | १७५ | १७५ | ८० |
| १० | पुणे | १७५ | १७५ | ७० |
| ११ | सातारा | २९० | २८१ | ७० |
| १२ | सांगली | ४१५ | १७५ | ७० |
| १३ | सोलापूर | १७५ | १७५ | ७० |
| १४ | कोल्हापूर | ५३ | ५३ | ८० |
| १५ | औरंगाबाद | १७५ | १७५ | ७० |
| १६ | जालना | ५३ | ५३ | ७० |
| १७ | परभणी | ५३ | ५३ | २६ |
| १८ | हिंगोली | ५३ | ५३ | २५ |
| १९ | बीड | १७५ | १७५ | ७० |
| २० | नांदेड | ५३ | ५३ | ७० |
| २१ | उस्मानाबाद | १७५ | १७५ | ७० |
| २२ | लातूर | १७५ | १७५ | २६ |
| २३ | बुलढाणा | ५२ | ५२ | ७० |
| २४ | अकोला | ५२ | ५२ | ७० |
| २५ | वाशिम | ५२ | ५२ | २५ |
| २६ | अमरावती | १५० | ५२ | ७० |
| २७ | यवतमाळ | ५२ | ५२ | ७० |
| २८ | वर्धा | ५२ | ५२ | २६ |
| २९ | नागपूर | ८० | ५२ | ० |
| ३० | भंडारा | ५२ | ५२ | २५ |
| ३१ | गोंदिया | ५२ | ५२. | २६ |
| ३२ | चंद्रपूर | ५२ | ५२ | ५० |
| ३३ | गडचिरोली | ५२ | ५२ | २६ |
| एकुण | | ३६०० | ३०६० | १८२० |

-------